
ARTHA, Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

वर्ष ३४ | पुणे, बुधवार १ मे, १९६८ | अंक ९




भारतासाठी प्रमुख वितरक : मे. टीजेय स्वस्तिक सेल्स कॉर्पोरेशन, बँक ऑफ इंडिया बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणे २.

## शेतकरी सहकारी साखर कारखाना लिमिटेड, सांगली

### शेतकऱ्यांचे जीवनात क्रांती

महाराष्ट्र राज्यात गाळप शक्तीत अग्रेसर असलेल्या व सहकार क्षेत्रात केंद्रबिंदू असलेल्या या सहकारी साखर कारखान्याने सन १९६७–६८ सालचे चालू गळित हंगामात एकूण तीन लाख, छत्तीस हजार टन उसाचे गाळप केले आहे, आणि चार लाख, दोन हजारांचेवर साखरपोती निर्माण करून अखिल भारतात गाळप शक्तीचा व साखरपोती निर्माण करण्याचा उच्चांक प्रस्थापित केला आहे. साखरेचा सरासरी उतारा १२ टक्के आहे. पुढील वर्षी २६०० टनाच्या गाळप शक्तीत आणखी वाढ करून चालू सीझनपेक्षा जास्त गळित व साखरपोती निर्माण करून राष्ट्रीय उत्पन्नात जास्तीत जास्त भर घालण्याची मनीषा बाळगून पुढील वर्षाचे विस्तारयोजनेचे कामास उत्स्फूर्तपणे सुरुवात करीत आहे.

कारखान्याने साखरनिर्मितीबरोबरच काही उपपदार्थांच्या निर्मितीस सुरुवात केली आहे. कारखान्याने मळीपासून अल्कोहोल निर्मितीची डिस्टिलरी गेली चार वर्षे उत्तम प्रकारे चालविली आहे. हायब्रीड सीडसचा प्रकल्प सर्वप्रथम हाती घेऊन शेतकऱ्यांना अधिक धान्योत्पादनाची नवी दिशा प्रत्यक्ष कार्यक्रमातून दाखवून दिली आहे. महाराष्ट्र सरकारच्या धोरणानुसार मद्यनिर्मितीच्या क्षेत्रातही पदार्पण केले असून देशाच्या संरक्षण विभागास व सर्वसामान्य जनतेस दारू व तत्सम पेये पुरविणेचे ठरविले असून प्रत्यक्ष उत्पादन येत्या दोन ते तीन महिन्यांत विक्रीसाठी खुले होईल. शेतकऱ्यांना शेतीच्या आंतरमशागतीसाठी आणि इतर प्रकारच्या शेतीच्या कामासाठी यांत्रिक मशागत करणारे मशिन व त्याची अवजारे तयार करण्याचा कारखाना नजीकच्या काळातच उभा करण्याचे ठरविले आहे. कृष्णेच्या काठावर शेतकऱ्यांना जीवनदायिनी ठरलेल्या जलसिंचन योजना मोठ्या प्रमाणात हाती घेऊन शेतकऱ्यांचे जीवनात क्रांती घडवून आणली आहे.

### मेढा येथील प्रगतिशील शेतकरी श्री. करंदीकर युनायटेड वेस्टर्न बँकेचे नवे डायरेक्टर

मेढा ( ता. जावळी, जि. सातारा ) येथील प्रगतिशील शेतकरी श्री. रा. वि. करंदीकर, बी. एससी. ( ऑनर्स ) ह्यांची युनायटेड वेस्टर्न बँक लि. च्या संचालक मंडळाचे सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. व्यापारी बँकांवरील सामाजिक नियंत्रण आणि बँकांचे कर्जविषयक धोरण शेतीप्रधान असले पाहिजे, ह्या सरकारी उद्देशास अनुसरून ही नियुक्ती करण्यात आली आहे.

समाजशिक्षणमालेचे प्रकाशन

**आपली चलनी नोट**

लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक 'अर्थ'

किंमत ५० पैसे.

**अधिक** धान्योत्पादन!

**अधिक** फायदा!!

**अधिक** बचत!!!

यांसाठी


किर्लोस्कर

**डिझेल एंजिन्स**

यांचीच निवड आवश्यक आहे....

कारण, अत्यंत कार्यक्षम व बिनतक्रार चालणारी अशी ही किर्लोस्कर एंजिनें, अधिक धान्योत्पादन व अधिक कमाई करण्यांस उपयुक्त आहेत.

किर्लोस्कर एंजिनें चालविण्यांस लागणारा तेलाचा खर्च, इतर एंजिन्सला लागणाऱ्या खर्चाच्या मानानें फारच कमी येतो.



**किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड**

रजि. ऑफिस-एलफिन्स्टन रोड, पुणें-३ (भारत)

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १ मे, १९६८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

## बँकिंगच्या व्यवसायात सरकारनिर्मित क्रान्तिकारक बदल

### समस्यांची निःपक्षपाती व संमजस चौकशी आवश्यक

श्री. चिं. वि. जोग हे १९४३ पासून बँकेचे प्रमुख कार्याधिकारी ह्या नात्याने महाराष्ट्र बँकेच्या अभ्युदयासाठी अविरत प्रयत्न करीत आहेत. १ कोटी रु. च्या ठेवींपासून ६३ कोटी रु. च्या ठेवींची आणि अर्धा कोटी रु. पासून ४० कोटी रु. च्या कर्जाची प्रगती त्यांच्या व्यवस्थापनेखाली झालेली आहे. बँकिंगमधील नव्या योजनेप्रमाणे ते आता महाराष्ट्र बँकेचे अध्यक्ष झाले आहेत आणि बँकेच्या ३३ व्या वार्षिक सभेतील त्यांचे भाषण हे त्यांचे पहिलेच अध्यक्षीय भाषण आहे. महाराष्ट्र बँकेचे भूतपूर्व अध्यक्ष प्रो. वा. गो. काळे आणि श्री. वा. पुं. वर्दे ह्यांच्या परंपरेला साजेसे असेच त्यांचे भाषण असून त्यांचा प्रत्यक्ष बँक व्यवहाराबाबत अनुभवही त्यात प्रतिबिंबीत झालेला आहे. त्यांनी बँकिंगच्या सद्यःस्थितीचा घेतलेला आढावा आणि केलेल्या सूचना त्यामुळे विशेष महत्त्वपूर्ण आहेत. त्यांच्या भाषणातील महत्त्वाचे मुद्दे येथे दिले आहेत.

बँकिंग व्यवसायाच्या इतिहासात १९६७ हे वर्ष निश्चितपणे कलाटणी देणारे म्हणून गणले जाईल. कारण " बँकांवरील सामाजिक नियंत्रण " म्हणून सध्या ज्या योजनेचा बोलबाला झाला आहे तिची मुहूर्तमेढ याच वर्षात रोवली गेली. बँकांच्या व्यवस्थापक व संचालकमंडळाची पुनर्घटना करून त्यांच्या कर्जव्यवहाराची उद्दिष्टे व धोरणे यांची व्याप्ती व दिशा बदलून ती सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या रोखाने निश्चित आखण्याचा हा अभिनव प्रयोग आहे.

या नवीन सुधारणेचे मुख्य सूत्र लक्षात घेऊन त्या अनुरोधाने शेतीव्यवसाय व लघुउद्योग यांना अनुकूल ठरेल अशा कर्ज-विषयक धोरणाची नवीन आणखी व मांडणी करण्याच्या दिशेने मोठ्या बँकांनी पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे.

शेतीव्यवसायास कर्जे देण्याच्या धोरणाबाबत बोलावयाचे झाल्यास बँकांनी त्या क्षेत्रात स्वतःस प्रत्यक्षात गुंतवून घ्यावे अगर त्यात सक्रिय भाग घ्यावा असे याअगोदर त्यांना कधीच ठामपणे सांगण्यात आलेले नव्हते ही वस्तुस्थिती आहे. प्रथमच ही नवीन जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली आहे, आणि ती कठीण, गुंतागुंतयुक्त, अनिश्चितता व जोखीम यांनी परिपूर्ण अशी आहे. परंतु बँकांनी हे नवीन आव्हान स्वीकारले असून स्वतःच्या कुवतीनुसार त्यास तोंड देण्यासाठी हालचाल सुरू केली आहे.

शेतीपतपुरवठा क्षेत्रात व्यापारी बँकांनी पदार्पण केल्यास त्याचा सहकारी बँकांचे कामकाजावर अनिष्ट परिणाम होईल याकरिता व्यापारी बँकांनी शेतीसाठी द्यावयाचे आर्थिक साहाय्य सहकारी बँकांमार्फत द्यावे असा युक्तिवाद पुढे करण्यात येत आहे. पण व्यापारी बँका व्यापारी पद्धतीनुसार स्वयंपूर्ण, भक्कम, किफायतशीर धंदा म्हणून जे शेतीव्यवसाय करतील अशांनाच आर्थिक साहाय्य देतील आणि असा व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कर्जविषयक गरजा सहकारी संस्था आपल्या घटनांनुसार पूर्णतया पुऱ्या करू शकत नाहीत. या कार्यक्षेत्रात दोन्हीही प्रकारच्या संस्थांना वाव आहे व प्रत्येकाचे कार्यक्षेत्र भिन्न ठेवता येण्यासारखे आहे. असे केले तर सहकारी संस्थांना आपल्या विस्तृत व सुसंघटित यंत्रणेद्वारा लहान लहान शेतकऱ्यांच्या पतविषयक गरजा अधिक प्रमाणात भागविण्यासाठी अधिक द्रव्य उपलब्ध करून देता येईल. सरकारने शेतकऱ्यांना उत्तेजन देण्यासाठी सहकारी बँकांना उपलब्ध केलेली स्टँप खर्चाच्या माफीची सवलत व्यापारी बँकांनाही लागू करावी. तसेच सरकारने पीकसंरक्षक विमा योजना अमलात आणली व स्टेट एड टु इंडस्ट्रीज नियमांच्या धर्तीवर शेतीसाठी दिल्या जाणाऱ्या कर्जाबाबत हमीयोजना कार्यान्वित केली तर शेतीस मोठ्या प्रमाणावर आर्थिक साहाय्य देण्यास बँकांना खात्रीने हुरूप येईल.

सामाजिक नियंत्रणाच्या योजनेचा गाभा म्हणजे राष्ट्रीय पतपुरवठा मंडळ. त्याची स्थापना सरकारने नुकतीच केली आहे. सदर मंडळाचे प्रमुख कार्य म्हणजे बँकांना मार्गदर्शक ठरतील. अशा पद्धतीने अर्थव्यवस्थेच्या वेगवेगळ्या विभागांना पतपुरवठा वाटण्याच्या कामी कामकाजाची दिशा ठरवून देणे. सदर मंडळ अर्थव्यवस्थेच्या विशिष्ट घटकांच्या मागण्यांचा अग्रक्रम ठरवून देईल व त्याप्रमाणे प्रत्येक घटकाचा शेकडा हिस्सा ठरवून देऊन पतपुरवठ्याचे न्याय्य व हेतुपूर्ण वाटप केले जावे या दृष्टीने बँकांना दिग्दर्शन करील. त्याने केलेल्या शिफारशींच्या अम्मलबजावणीचे काम रिझर्व्ह बँकेकडे राहील.

अर्थव्यवस्थेतील असंघटित व बिगर-बँकिंग क्षेत्रात सेळत असलेला पतपुरवठा फारच विशाल आहे. त्या मानाने बँकांकडून दिला जाणारा पतपुरवठा अल्पसा आहे. त्यामुळे राष्ट्रीय पतपुरवठा मंडळाच्यामार्फत वाटप होणारा पतपुरवठाही अगदीच अल्प राहणार. असंघटित पतपुरवठ्यावर रिझर्व्ह बँकेचे व सरकारचे कोणतेही नियंत्रण नाही. अर्थव्यवस्थेत अग्रक्रम असणाऱ्या घटकांना पतपुरवठा बऱ्याच मोठ्या प्रमाणावर लागेल; शिवाय कोणत्या घटकांना अग्रक्रम द्यावयाचा हे सर्वस्वी राजकीय मतप्रवाहावर अवलंबून असल्यामुळे अनिश्चित आहे. अशा परिस्थितीत बँका स्वतःजवळील साधनसंपत्तीतून जो पतपुरवठा अशा घटकांना करू शकतील तो अगदीच मर्यादित आहे.

अशा परिस्थितीत संघटित संस्थांमार्फत होणाऱ्या पतपुरवठ्याच्या आकारमानात राष्ट्रीय पातळीवर उगमस्थानीच जर भरघोस भर पडली नाही तर बँकांकडून सध्या होत असलेला राष्ट्रीय गरजेच्या मानाने अगदीच तोकडा असा पतपुरवठा सामाजिक नियंत्रणाच्या योजनेनुसार वाटण्याचा खटाटोप निश्चित परिणामकारक होईलच असे सांगता येणार नाही. त्याकरिता राष्ट्रीय पतपुरवठ्याचा साठा मुळातच वाढला पाहिजे. ह्या दृष्टीने जरूर ते उपाय योजले पाहिजेत व जरूर ती कारवाई केली पाहिजे. तेव्हा सध्या देशापुढील व बँकिंग व्यवसायापुढील अत्यंत निकडीचे कार्य म्हणजे लोकांकडील बचतसंचय गोळा करण्याची यंत्रणा व मोहीम अधिक गतिमान करणे.

हा प्रश्न शास्त्रीय पद्धतीने व निःपक्षपातीपणाने एकदा कायमचा निकालात काढण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे. बँकांचा कारभारावर होणारा वाढत्या प्रमाणावरील खर्च व आकुंचित होत असलेले नफ्याचे मान लक्षात घेता भारतीय बँकिंग पद्धती, नाणेपुरवठा, चलननीती, या सर्व क्षेत्रांची समग्र चौकशी करण्यासाठी एका संपूर्ण बँकिंग कमिशनच्या नेमणुकीची आवश्यकता निर्माण झाली आहे. कमकुवत व डळमळीत पाया असलेला शेतीव्यवसाय व लघुउद्योगधंदे या विभागांना कर्जपुरवठा करण्याची नवी जबाबदारी व नवी जोखीम बँकांवर टाकली गेली आहे, तर दुसरीकडून सतत वाढणारा खर्च व उत्तरोत्तर घटत जाणारा नफा यांमुळे बँकांना राखीव निधीत भरघोस भर टाकता येत नाही व गंगाजळी व भांडवल यांचे ठेवीशी शिष्टसंमत प्रमाण ठेवणे दुरापास्त होऊन बसले आहे. बँकिंगच्या क्षेत्रात अधिकात अधिक भांडवल गोळा करणेही अवघड जात आहे. बँकांचा भांडवली पाया भक्कम करून सर्व बँकिंग संघटनेस बळकटी आणणे जास्त आवश्यक झाले आहे.

---

## कापड गिरण्यांच्या आधुनिकीकरणासाठी पैसा हवा

अहमदाबाद गिरणी मालक संघटनेची वार्षिक बैठक अहमदाबाद येथे भरविण्यात आली होती. ह्या प्रसंगी बोलताना संघटनेचे मावळते अध्यक्ष श्री बाळकृष्ण हरिवल्लभदास म्हणाले की, कापडगिरण्यांचे आधुनिकीकरण करण्याची जरुरी सरकारला पटलेली आहे. तेव्हा ह्या कामासाठी लागणारा पैसा उपलब्ध करून देणे ही अर्थातच सरकारची जबाबदारी आहे. कापडगिरण्यांच्या धंद्याने गिरण्यांची यंत्रसामुग्री आधुनिक पद्धतीची करण्यासाठी प्रयत्न केले. असे केल्याशिवाय उत्पादनाचा खर्च कमी होऊ शकणार नाही. परंतु पैशाच्या अभावी त्यांच्या प्रयत्नांना यश लाभू शकले नाही. पैसा उपलब्ध न होण्याची कारणे अशी आहेतः पहिले असे की गिरण्यांच्या नफ्यात घट झालेली आहे. गिरण्यांजवळ स्वतःचा पैसा उपलब्ध होण्याचे नेहमीचे मार्ग बंद झालेले आहेत, शिवाय, गिरण्यांवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांचे जबर ओझे लादण्यात आले आहे. हे ओझे हलके केल्याशिवाय देशाची अर्थव्यवस्था भक्कम पायावर उभी करणे शक्य होणार नाही. गेल्या दहा वर्षांच्या अवधीत कापडगिरण्यांनी निर्यातीच्या बाबतीत सर्वांत खालची पातळी गाठलेली आहे. कापडाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारताला स्पर्धा करण्यासारख्या किमती ठेवता आलेल्या नाहीत. ह्याचे कारण उत्पादनाचा वाढता खर्च आणि इतर देशांच्या तीव्र स्पर्धा, ही आहेत. सध्या कापडगिरण्या आर्थिक अडचणीत सापडलेल्या आहेत. निर्यातीत वाढ झाली तर ह्या अडचणीतून त्यांना बाहेर पडता येईल. परंतु निर्यात वाढविण्यासाठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील चढाओढीत टिकतील अशा कापडाच्या किमती ठेवता आल्या पाहिजेत.

---

## जागतिक दुष्काळाचा पुन्हा इशारा

ऑस्ट्रेलियातील एका जीवशास्त्रज्ञाने असा इशारा दिला आहे की लोकसंख्येच्या वाढीवर परिणामकारक नियंत्रण ठेवता न आल्यास येत्या १० वर्षांत जगावर दुष्काळाचे संकट कोसळल्याशिवाय राहणार नाही. त्याच्या हिशेबाने, जगाची लोकसंख्या येत्या ३० वर्षात सध्याच्या दुपट होणार आहे. एवढ्या लोकांना खाण्यासाठी पुरेसे अन्न उपलब्ध होण्यासाठी आजच्या अन्नधान्याच्या निर्मितीत तिपटीने वाढ झाली पाहिजे. पण, उत्पादनात इतकी वाढ होण्याची शक्यता अत्यल्प आहे. एखाद्या उताराच्या रस्त्यावर वेगाने घसरणाऱ्या वाहनाच्या गतीप्रमाणे लोकसंख्या वाढत आहे. मृत्यूच्या प्रमाणात वाढ होऊ द्यावयाची नाही, असे ठरविल्यास जन्माचे प्रमाण घटविणे हा एकच मार्ग आहे.

### बेकार इंजिनिअर्ससाठी नोकऱ्यांची योजना

इंजिनिअर्समधील वाढत्या बेकारीवर तात्कालिक उपाय-योजना करण्यासाठी मध्यवर्ती सरकारने १० कोटी रुपयांची जादा तरतूद करावी, अशी नियोजन मंडळाची सूचना आहे. सरकारी आणि लष्करी कारखान्यांतील इंजिनिअरांच्या सर्व रिकाम्या जागा तत्काळ भरण्यात याव्या, चवथ्या आणि पाचव्या पंचवार्षिक योजनांच्या प्राथमिक आराखड्यास लागलीच प्रारंभ करण्यात यावा आणि औद्योगिक उमेदवारीचे कार्यक्रम वाढविण्यात यावेत, असे नियोजन मंडळाने सुचविले आहे. त्यामुळे, १९६८–६९ मध्ये २०,००० इंजिनिअरिंगच्या पदवीधरांना व डिप्लोमावाल्यांना काम मिळेल, असा अंदाज आहे. लघु उद्योगांच्या स्थापनेकडे इंजिनिअर्स वळले, तर त्यांना राज्य सरकारांनी आर्थिक साह्य करावे, इंजिनिअर्सच्या सहकारी संस्थांनाहि प्रोत्साहन द्यावे, अशीहि मंडळाची शिफारस आहे. आर्थिक संस्थांकडून कर्जे घेणाऱ्या फर्म्सनी भारतीय इंजिनिअर्सचाच सल्ला घ्यावा, सरकारी कंत्राटदारांनी लायक इंजिनिअर्सना नोकरी द्यावी, असेहि मंडळाने म्हटले आहे. सध्या पदवीधर आणि डिप्लोमावाले मिळून ४०,००० इंजिनिअर्स बेकार आहेत. म्हणजे, एकूण इंजिनिअर्सपैकी १२% लोकांना काम नाही. विद्युत् उत्पादनाच्या केंद्रांच्या देखभालीसाठी लायक माणसे उपलब्ध नाहीत. ही उणीव भरून काढण्यासाठी ट्रेनिंगच्या योजनेवर ३३ लक्ष रु. खर्चून १,५०० इंजिनिअर्सना काम पुरविता येईल. येत्या वर्षापासून इंजिनिअरिंगच्या संस्थांतून कमी उमेदवारांना प्रवेश देण्यात यावा असेहि मंडळाने म्हटले आहे. चिनी आक्रमणाच्या वेळेच्या मानाने आता नव्या उमेदवारांची संख्या दुपटीवर गेलेली आहे. १५ हजारांचे २४ हजार इंजिनिअरिंगच्या व २८ हजारांचे ४६ हजार डिप्लोमाच्या संस्थांतून दरसाल प्रवेश करीत आहेत.

### व्हिएटनामधील युद्धामुळे भरभराट

उत्तर व्हिएटनाम आणि दक्षिण व्हिएटनाम ह्यांच्यातील युद्ध थांबविण्याचे प्रयत्न अलीकडे पुन्हा जोराने होऊ लागले आहेत. संयुक्त राष्ट्र संघटना हा संघर्ष थांबविण्यासाठी प्रयत्नशाली आहे. तथापि, ह्या संघटनेच्या आशिया व अतिपूर्व मंडळाचा जो आर्थिक अहवाल प्रसिद्ध झाला आहे त्यावरून असे दिसते की, ह्या युद्धामुळे आग्नेय आशियातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्था भरभराटल्या आहेत. तैवान ( फॉर्मोसा ), सिंगापूर, दक्षिण कोरिया आणि थायलँड ह्या देशांना युद्धामुळे विशेष फायदा झाला आहे. दक्षिण व्हिएटनामला ह्या देशांकडून अनेक प्रकारचा पक्का माल निर्यात करण्यात येत असे. गेल्या दोन-तीन वर्षांत ह्या मालाच्या निर्यातीत खूप वाढ झालेली आहे. परिणामी, तेथील उत्पादनही वाढले आहे. युद्ध थांबल्यास ह्या देशांच्या अर्थव्यवस्थेत गोंधळ उत्पन्न होईल.



### स्वस्तिकचे श्री. वसंतराव वैद्य युरोप-अमेरिका दौऱ्यावर

स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लि. चे कार्यकारी संचालक श्री. वसंतराव वैद्य युरोप–अमेरिकेतील स्वस्तिकच्या व्यापार-विकास दौऱ्यासाठी दि. २८ रोजी मुंबईहून विमानाने इटालीस रवाना झाले. इटाली, पश्चिम जर्मनी, स्कँडिनेव्हिअन देश, ब्रिटन, कॅनडा व अमेरिका इत्यादी पाश्चिमात्य राष्ट्रांच्या भेटीत श्री. वैद्य स्वस्तिकमध्ये होत असलेल्या विविध वस्तूंच्या निर्यातीबाबत तेथील उद्योगपतींशी वाटाघाटी करणार आहेत.

स्वस्तिक रबर प्रॉडक्टसमधील मालाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आज मोठी मागणी असून दोन वर्षांत कंपनीने ११,४२,७०१ रुपयांवरून ३७,१७,००० रु. किंमतीच्या विविध वस्तू निर्यात केल्या आहेत. कंपनीच्या विकासयोजना व २५ लाख रुपयांच्या 'समान भांडवल' विक्रीमुळे निर्यातीत ५० टक्के वाढ होईल असा विश्वास आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यात श्री वैद्य मायदेशी परततील.

### डॉ. किंग व भगतसिंग ह्यांच्या सन्मानार्थ तिकिटे

अमेरिकन निग्रो पुढारी डॉ. मार्टिन ल्यूथर किंग आणि हिंदी क्रांतिवीर भगतसिंग ह्यांच्या स्मृत्यर्थ खास पोस्टाची तिकिटे भारत सरकार काढणार आहे.

### बढतीचा पाळण्याशी संबंध जोडणार

तीन अपत्यांनंतर पाळणा न थांबविणाऱ्या सरकारी नोकरांची बढती थांबविण्यात यावी; त्यानंतर त्याने संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करून घेतली, तरच बढती दिली जावी, असा नियम करण्याचा मध्यवर्ती सरकारचा विचार आहे.

### वनस्पती तुपाचा सहकारी कारखाना

महाराष्ट्रात लातूर येथे वनस्पती तुपाचे उत्पादन करणारा पहिला सहकारी कारखाना काढण्यात आला आहे. ह्या कारखान्यात रोज पाच टन वनस्पती तूप निर्माण करता येईल. तुपासाठी लागणारे पत्र्याचे डबे तयार करण्याचा एक विभागही कारखान्यात उभारण्यात आला आहे.

## किमतींवरील नियंत्रणाचे योग्य धोरण कोणते ?

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. एल. के. झा ह्यांनी दिल्ली येथे केलेल्या भाषणात किमतींवरील नियंत्रणाच्या कार्याबद्दल महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. श्रीराम स्मारक व्याख्यान मालेत 'विकसनशील देशांतील किमतीविषयीचे धोरण' ह्या विषयावर ते बोलत होते. ते म्हणाले की किमतीवरील नियंत्रणाचे हत्यार दोन हेतू साध्य करण्यासाठी वापरण्यात आले पाहिजे. किमतीचे नियमन करण्याच्या धोरणामुळे समाजातील आर्थिक दृष्टीने अधू असलेल्या लोकांची काळजी घेतली पाहिजे. पण त्याचबरोबर उत्पादनाला उत्तेजन देण्याचे आणि भांडवल गुंतविण्याचे कार्यही करण्यात आले पाहिजे. किमतीबाबत संपूर्णपणे मध्यवर्ती नियंत्रण आणि संपूर्ण स्वातंत्र्य ह्या दोन्हीतील मधला मार्ग शोधून काढण्यात आला पाहिजे. विकासाची गती टिकून राहण्याच्या मार्गात चलनवृद्धीमुळे होणारी भाववाढ हा फार मोठा व कायमचा धोका आहे. ज्या देशातील बहुसंख्य लोक दारिद्र्यात बुडालेले आहेत त्या देशात किमतीबाबत संपूर्ण स्वातंत्र्याचे धोरण उपयुक्त ठरत नाही. कारण, देशातील श्रीमंत वर्ग सर्वच्या सर्व माल चढ्या किमती देऊन विकत घेऊ शकतो. विकासमग्न देशात कोणीही मुद्दाम प्रयत्न न करता मक्तेदारीची परिस्थिती निर्माण होणे शक्य असते आणि अशा परिस्थितीत किमती नियंत्रित ठेवण्याची इच्छा साहजिकच उत्पन्न होते. भारतात बचतीची टंचाई आहे आणि परदेशी चलन दुष्प्राप्य आहे. ह्या अवस्थेतून मार्ग काढण्यासाठी भांडवलाच्या गुंतवणुकीला जाणीवपूर्वक विशिष्ट दिशा लावण्यात आली पाहिजे आणि समाजातील दरिद्री लोकांकडे खास लक्ष देण्यात आले पाहिजे.

किंमतीसंबंधीचे योग्य धोरण असे असले पाहिजे की त्यामुळे वस्तूंच्या टंचाईच्या परिस्थितीत ग्राहकाची पिळणूक होण्याचे बंद झाले पाहिजे, हा झाला नजीकचा हेतू. पण दूर दृष्टीने पाहता ह्याच धोरणामुळे उत्पादकाला उत्पादन वाढविण्याची प्रेरणाही त्यामुळे मिळाली पाहिजे. किमतीबाबतचे धोरण केवळ एखाद्या तत्त्वज्ञानावर अधिष्ठित असून चालणार नाही. आर्थिक व्यवहार सौकर्याने चालविण्याचे एक हत्यार म्हणून त्याचा उपयोग करण्यात आला पाहिजे. किमतीचे नियमन आणि त्यांचे नियंत्रण ह्या गोष्टी एकच मानता येणार नाहीत. रशिया आणि युगोस्लाव्हिआ ह्या देशांतील अर्थव्यवस्था समाजाभिमुख आहेत. पण तेथेही आता किमतीसंबंधीच्या धोरणाचे महत्त्व अधिक ढोळसपणे मान्य करण्यात येऊ लागले आहे. ह्या धोरणाने भारतात एक महत्त्वाचा हेतू साध्य झाला पाहिजे. किमती, विशेषतः अन्नासारख्या प्राथमिक गरजेच्या वस्तूंच्या किमती, स्थिर करण्यात आल्या पाहिजेत आणि तशा त्या राखण्यात आल्या पाहिजेत. वस्तूंची आणि सोयी-सवलतींची उपलब्धता लक्षात घेऊन त्यावरील एकूण खर्चावर मर्यादा घातली तर हे शक्य होईल. शेतीच्या नियोजनाच्या पहिल्या अवस्थेत अन्नधान्याच्या किमती खालच्या पातळीवर राखण्यावर भर देण्यात आला होता. पण आता हा काळ संपलेला आहे. प्रमुख अन्नधान्यांना किमान किमती मिळण्याच्या आवश्यकतेवर हल्ली भर देण्यात येत आहे आणि ही गोष्ट योग्य अशीच आहे. कारण, शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी धोरणात केलेला हा बदल आवश्यक आहे. शेतीच्या उत्पादनासाठी गुंतवणूक करण्यास आणि उत्पादन वाढविण्यास प्रेरणा मिळण्यासाठी हे नवे धोरण उपयुक्त आहे.

---

## औषधांच्या कारखान्याच्या मालाला परदेशी मागणी

मद्रास येथील सार्वजनिक मालकीच्या औषधांच्या कारखान्याच्या मालाला परदेशाची मागणी येऊ लागली असून औषधांच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तो प्रवेश करून घेईल अशी चिन्हे दिसत आहेत. कारखान्याचे अध्यक्ष श्री. इंद्रजित सिंग ह्यासंबंधी माहिती देताना म्हणाले की परदेशी बाजारपेठा शोधण्याचे बाबतीत चांगली प्रगती होत आहे. कारखान्यात तयार करण्यात येत असलेल्या शस्त्रक्रियेच्या उपकरणांना पश्चिम आशियातील आणि आग्नेय आशियातील काही देशांकडून मागणी आलेली आहे. त्याचप्रमाणे, युरोपमधील काही देशांकडून औषधे पुरविण्याविषयी विचारणा होत आहे. त्यांच्याशी सध्या वाटाघाटी चालू आहेत. त्या लवकरच फलद्रूप होतील असा विश्वास वाटत आहे. युगोस्लाव्हिआ, हंगेरी आणि बल्गेरिआ हे देश औषधे खरेदी करण्यासंबंधी आस्था दाखवीत आहेत. त्याशिवाय ऑस्ट्रेलिया, मलेशिया आणि कोलंबिया ह्या देशांकडून औषधे पुरविण्याविषयी चौकशी करण्यात येत आहे. परदेशी बाजारपेठांबरोबरच देशातील औषधांच्या बाजारपेठेतही कारखान्याचा माल आपला प्रभाव पाडू लागला आहे. अलीकडे कारखान्याने ३१ टन औषधे बाजारपेठेत विकली आहेत. सार्वजनिक संस्थांतून औषधे पुरविण्याची १४ टेंडर्स कारखान्याने मिळविली आहेत. १९६८-६९ सालात कारखान्यातील काही औषधांचे उत्पादन उत्पादनक्षमतेच्या ५० ते ७५ टक्के होऊ लागेल. शस्त्रक्रियांसाठी कोणत्या प्रकारची उपकरणे लागतात ह्याचा अभ्यास करण्याचे काम सध्या एका समितीकडे सोपविण्यात आले आहे. त्यासंबंधीचा अहवाल तयार झाल्यावर मागणीप्रमाणे शस्त्रक्रियेच्या उपकरणांचे उत्पादन सुरू करण्यात येणार आहे.

---

## पौंडाची जागा फ्रँकने घेतली

जपान आणि चीन ह्यांच्यामधील व्यापारी देणी-घेणी आतापर्यंत पौंडात दिली-घेतली जात असत. पौंडाची जागा आता फ्रेंच फ्रँकने घेतली आहे. गेल्या नोव्हेंबरात पौंडाचे अवमूल्यन झाले त्याचा हा परिणाम आहे.

### औद्योगीकरण साधण्याचे पाकिस्तानचे प्रयत्न

पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांनी पाकिस्तानचे औद्योगीकरण झपाट्याने साधण्याचे प्रयत्न चालविले आहेत. १९६५ च्या भारत-पाकिस्तान लढाईनंतर मिळेल त्या मार्गाने लष्कराची वाढ करण्याचे धोरण अवलंबिण्यात आले आहे. त्याचप्रमाणे आर्थिक मदतही भिन्न राजकीय मतप्रणालीच्या देशांकडून मिळविण्यात येत आहे. रशिआचे पंतप्रधान मि. कोसिजिन अलीकडे पाकिस्तानला भेट देऊन गेले. ह्या भेटीत पाकिस्तानला मोठ्या प्रमाणावर मदत देण्याचे रशिआने कबूल केले आहे. विशेषतः अवजड उद्योगधंद्यांच्या स्थापनेसाठी ही मदत देण्यात येणार आहे. पाकिस्तानात अवजड उद्योगधंदे स्थापन करण्यासाठी लागणारा कच्चा माल उपलब्ध नाही, तरी सुद्धा अशा उद्योगधंद्यांचा पाया घालण्याची मनीषा पाकिस्तानने धरलेली आहे. चितगाव येथे जपानच्या मदतीने पोलादाचा एक छोटा कारखाना काढण्यात आला आहे. आता पश्चिम पाकिस्तानात रशियाच्या मदतीने कालबाग येथे त्यापेक्षा अधिक मोठा पोलादाचा कारखाना काढण्यात येणार आहे. त्याशिवाय विजेची भारी यंत्रसामग्री तयार करण्याचे दोन कारखाने आणि उष्णतेच्या साह्याने वीज उत्पन्न करणारी दोन केंद्रे काढण्यासाठी पाकिस्तान रशियाकडे मदत मागत आहे. चीनने सिमेंटच्या धंद्यासाठी लागणारी यंत्रसामग्री तयार करण्याचा एक कारखाना ह्यापूर्वीच उभारून दिला आहे. १९६५ साली झालेल्या ताश्कंद कराराचा फायदा घेऊन भारत व पाकिस्तान ह्या दोन्ही देशांत आपले वजन वाढविण्याचा प्रयत्न रशिया करीत आहे. त्याचा फायदा पाकिस्तानला मिळू लागला आहे.

### अमेरिकेला आर्थिक संकटाचा इषारा

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह बोर्डाचे अध्यक्ष विल्यम मार्टिन ह्यांनी १९३१ सालच्या आर्थिक संकटानंतरचे सर्वात मोठे आर्थिक अरिष्ट अमेरिकेवर कोसळण्याचा इषारा दिला आहे. त्यावर उपाय म्हणून अमेरिकन सरकारने व काँग्रेसने कर वाढवून चलनवृद्धीला आळा घालावा आणि डॉलरवरील लोकांचा विश्वास पुन्हा बळकट करावा असे त्यांचे म्हणणे आहे. असे करण्यात आले नाही तर अमेरिकेला नियंत्रण घालण्यास अशक्य अशा आर्थिक मंदीला तोंड द्यावे लागेल अगर बेलगाम चलनवृद्धीचे परिणाम तरी सोसावे लागतील. अमेरिका जर आर्थिक अरिष्टाच्या चक्रात सापडली तर सर्व जगातील चलनांचे अवमूल्यन करावे लागेल आणि त्यामुळे जगभर आर्थिक अवकळा पसरेल असेही भाकित त्यांनी केले आहे.


### माकडांची व माणसांच्या केसांची निर्गत


१९६७-६८ मध्ये ३५,५६९ माकडांची निर्गत करण्यात आली आणि त्यापासून २७ लक्ष रुपयांच्या परदेशी चलनाची प्राप्ती झाली. माणसांच्या केसांच्या निर्गतीने ९७ लक्ष रुपये मिळवून दिले.




उत्पादक -
भिडे अँन्ड सन्स प्रा. लि. सांगली
महाराष्ट्र राज्य.



महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा.
४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग


तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्


१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड.
शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.
— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

# बक्षिस मिळवा रु. १२००/-

प्रत्येक संस्थेचे एक बोधचिन्ह असते, ते पाहिले की संस्था व तिचे कार्य डोळ्यासमोर उभे राहाते. तुम्ही हें कोणाचें बोधचिन्ह आहे हें ओळखले असेलच. या संस्थेकरितां रेडिओवरील जाहिरातीसाठीं २० ते ३० शब्दापर्यंत मजकूर अथवा ध्वनिचित्र आपण सुचवा व बक्षिस मिळवा. त्यासाठी प्रवेश फी नाही. फक्त खालील प्रश्नांची उत्तरे व रेडिओ वरील जाहिरातीसाठीं या संस्थेच्या दृष्टीने योग्य तो मजकूर अथवा ध्वनिचित्र पाठवा.

परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. पसंत मजकूर वा चित्र कुठल्याही पद्धतीने वापरण्याचा हक्क संस्थेस राहील. या बाबत पत्रव्यवहार केला जाणार नाही.

- पहिलें बक्षिस रु. ५००
- दुसरें बक्षिस रु. २५०
- तिसरें बक्षिस रु. १५०
- चौथें बक्षिस रु. १००
- पांचवें व सहावें प्रत्येकी रु. ५०
- उत्तेजनार्थ १० बक्षिसें

उत्तरे पाठविण्याची शेवटची तारीख १० मे ६८

१ हें बोधचिन्ह कोणत्या संस्थेचे आहे ?

२ या संस्थेच्या जाहिराती आपण बघितल्या काय ? कोठें ?

३ आपल्याला कोणती जाहिरात आवडली ?

४ आपण या संस्थेसाठीं वेगळी चित्रमय जाहिरात सुचवूं शकाल काय ? चित्रासाठी वेगळा कागद जोडावा.

५ आपण रेडिओवर या संस्थेची जाहिरात ऐकली काय ?

६ रेडिओवर या संस्थेच्या जाहिराती कोणत्या भाषेत असाव्यात ?

७ आपला या संस्थेशी कोठल्याही प्रकारें संबंध आहे काय ?

८ आपण सुचविणार असलेला मजकूर अथवा ध्वनिचित्रः हिंदी, मराठी अगर इंग्रजी

९ आपले नांवः

१० पत्ताः

११ व्यवसायः

१२ वय

१३ वार्षिक उत्पन्न : रु. (ही माहिती गुप्त ठेवली जाईल)

१४ आपण कोणती-हिंदी, मराठी, गुजराथी, इंग्रजी वर्तमानपत्रें व मासिकें वाचतां ? १ २ ३ ४ ५ ६

उत्तरें खालील कोणत्याहि पत्त्यावर पाठवावीत :

अल्को अॅडव्हर्टायझिंग,
बी. पी. ए. हाउस, १०७, म. गांधी रोड, मुंबई-१.

पॅरामाउंट पब्लिसिटी प्रा. लि.,
४८१ शनिवार पेठ, पुणे-२.

प्रतिमा अॅडव्हर्टायझिंग,
३३/९, प्रभात रस्ता, पुणें-४.

BM/68/16

## कुटुंबनियोजनाचे अजब अर्थशास्त्र

कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमामुळे भारताला गेल्या आर्थिक वर्षात ३३३ कोटी रु. चा फायदा झाला, असे गणित मध्यवर्ती आरोग्य मंत्री श्री. सत्यनारायणसिंह ह्यांनी मांडले आहे. गेल्या वर्षी निर्बिजीकरण, लूप, इत्यादी संततिप्रतिबंधक उपायांमुळे १२ लक्ष अर्भकांचा जन्म थोपविण्यात आला, असा अंदाज आहे. प्रत्येक थोपविलेल्या जननामुळे देशाचे ३,००० रुपये वाचतात. (त्याचा शिक्षण खर्च, औषध खर्च, रोजगार निर्मितीचा खर्च, इ. करावा लागणार नाही.) म्हणजे १२ लक्ष अर्भकांना जन्म न दिल्यामुळे १२ लक्ष×३,००० रु. = ३६० कोटी रु.चा खर्च वाचला. कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाचा २७ कोटी रु. खर्च त्यातून वजा घातला, म्हणजे निव्वळ फायदा ३३३ कोटी रु. उरला.

गेल्या वर्षी १३० लक्ष अर्भके जन्माला आली, त्यातल्या निम्म्यांचा तरी जन्म थोपविणे इष्ट होते. म्हणजे ६५ लक्ष अर्भकांच्या जन्मामुळे ६५ लक्ष × ३,००० रु. = १९५० कोटी रु. चा चुराडा झाला, असाही हिशेब आरोग्यमंत्र्यांनी सांगितला असता म्हणजे बरे झाले असते. ३६० कोटींच्या बचतीच्या मानाने १९५० कोटींचा चुराडा केवढा तरी मोठा आहे.

काही ठिकाणी लोक निर्बिजीकरणाची शस्त्रक्रिया करवून घेण्याचे लांबणीवर टाकीत आहेत; कारण त्या शस्त्रक्रियेपासून आज ३० रु. मिळविण्यापेक्षा पुढे ट्रॅन्झिस्टर सेट मिळण्याची त्यांना आशा वाटत आहे. मळ्यातील मजुरांना ह्या शस्त्रक्रियेसाठी १०० रु. देण्याचा हेतू, बाळंतपण व इतर कौटुंबिक प्रसंगी द्याव्या लागणाऱ्या सवलती देण्याचे टळावे, हा आहे असे त्यांच्या युनियनचे पुढारी प्रचार करीत आहेत.

## पंजाबी राज्यभाषा केल्यामुळे गोंधळ

पंजाब राज्यात गेल्या महिन्याच्या १३ तारखेपासून राज्यकारभारात पंजाबी भाषा वापरण्यास प्रारंभ करण्यात आला. त्यामुळे पंजाब सरकारच्या सचिवालयातील आणि जिल्हा कचेऱ्यातील कामकाज जवळ जवळ थंडावले. पंजाब राज्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांपैकी बहुसंख्याकांना पंजाबी भाषा लिहिता अगर वाचता येत नाही. त्यामुळे कचेऱ्यात येणाऱ्या बाहेरच्या पत्रव्यवहारासोबत पत्राचे इंग्रजी भाषांतर देण्यात येऊ लागले आहे. हे अधिकारी आपला मजकूर इंग्रजीत सांगतात आणि मग त्या मजकुराचे भाषांतर पंजाबीत करण्यात येते. सांगितलेल्या मजकुराचे भाषांतर बरोबर झाले आहे की नाही ह्याची त्यांना खात्री वाटत नाही. त्यामुळे कामाला विलंब लागतो. त्याशिवाय पंजाबी भाषेतील लघुलेखक व टंकलेखक ह्यांचाही तुटवडा आहे. गुरुमुखी भाषेतील टंकलेखन यंत्रेही अपुरी पडत आहेत.

## दंतरोगांचे मूळ सदोष आहारात आहे

अमेरिकेतील कॉर्नेल विद्यापीठातील एका शास्त्रज्ञाने दंतरोगांच्या उत्पत्तीविषयी नेहमीपेक्षा निराळी मते व्यक्त केली आहेत. हिरड्या काही कारणाने सुजून खराब होतात आणि दातांवर आपत्ती ओढवते, असे सामान्यतः सांगण्यात येते. पण डॉ. हेनरिक्सन ह्यांच्या मताने, वयात आलेल्या माणसांना दात गमवावे लागतात ते सदोष आहारामुळे. हिरड्यांना होणारे रोग योग्य तो आहार घेतल्यास टाळता येतील असे त्यांचे म्हणणे आहे. अमेरिकेत सुमारे २ कोटी लोकांना रोगट हिरड्यांमुळे दात गमवावे लागण्याची शक्यता आहे. ३४ वर्षांची मर्यादा ओलांडलेल्या ह्या लोकांचे दांत पायोरिआ ह्या रोगाने धोक्यात आले आहेत. डॉ. हेनरिक्सन ह्यांनी कुत्र्यांवर प्रयोग करून आपल्या उपपत्तीचा खरेखोटेपणा पडताळून पाहिला आहे. त्यांनी प्रयोगातील कुत्र्यांना कमी प्रमाणात कॅलशिअम असलेले आणि फार मोठ्या प्रमाणात गंधक असलेले अन्न दिले. त्याचा परिणाम कुत्र्यांच्या हिरड्यांवर होऊन त्यांना वरील रोग जडला. ह्या रोग टाळण्यासाठी दूध व दुधाचे पदार्थ ह्यांचा आहारात समावेश असला पाहिजे. पण अमेरिकेत कॅलशिअमचे प्रमाण अल्प असलेल्या अन्नपदार्थांचे उत्पादन अलीकडे वाढत चालले आहे, ह्या गोष्टीकडे त्यांनी मुद्दाम लक्ष वेधले आहे. मांस, मांसापासून बनविलेले पदार्थ आणि पावरोटी ह्या पदार्थांत कॅलशिअमचे प्रमाण कमी असते आणि गंधकाचे प्रमाण फार असते. दातांना आधार देणारी हाडे हिरड्या सुजल्यामुळे कमजोर होतात आणि त्यामुळे दात खराब होतात असे शास्त्रज्ञांचे चालू मत आहे. पण डॉ. हेनरिक्सन ह्यांच्या मताने प्रथम हिरड्या सुजत नाहीत; दाताखालची हाडे प्रथम रोगग्रस्त होतात.

## भारताने ४१ कोटी रु. ची कर्जे दिली

१९५० ते १९६७ ह्या काळात भारताने इतर देशांना एकूण ४१·६५ कोटी रु. ची कर्जे दिली. बर्मा (२० कोटी रु.), अफगाणिस्तान (१ कोटी रु.), सिक्किम (५६ लक्ष रु.), भूतान (४२ लक्ष रु.), नेपाळ (२·०८ कोटी रु.), सिलोन (७ कोटी रु.) आणि इंडोनेशिया (१०·५९ कोटी रु.) ह्या देशांनी ती कर्जे घेतली.

## हिरोशिमावरील बॉंब वर्षावाच्या हाहाःकाराचा चित्रपट

हिरोशिमा आणि नागासाकी या जपानी शहरांवरील अणुबॉंब वर्षावाचे परिणाम दर्शविणारा चित्रपट टेलिव्हिजनवर नुकताच दाखविण्यात आला. १९४५ सालीच टोकियो विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी हा चित्रपट घेतला होता, पण अमेरिकन अधिकाऱ्यांनी तो जप्त करून त्याच्या प्रदर्शनास बंदी घातली होती. अमेरिका–जपान संबंधात कटुता येऊ नये ह्यासाठी आजवर तो दाखविण्यात आला नव्हता.


रब्बी पिके निघाली...
...खरीप पिकांची उसाभर
आता सुरू होणार
संकरित बियाणे वापरून
अन्नधान्य स्वयंपूर्णतेचे
ध्येय गाठू !
UMROTKAR
आठव्या महाराष्ट्र दिनाची हीच प्रतिज्ञा

## ब्रिटन–ॲन ऑफिशियल हँडबुक, १९६८

ब्रिटिश स्टेशनरी ऑफिसने लंडनमध्ये प्रसिद्ध केलेली "ब्रिटन–ॲन ऑफिशियल हँडबुक" या संदर्भ ग्रंथाच्या १९६८ सालच्या आवृत्तीची प्रत आता येथे उपलब्ध झाली आहे. या ग्रंथाच्या प्रकाशनातील १९६८ ची ही आवृत्ती एकोणिसावी आवृत्ती. सेंट्रल ऑफिस ऑफ इन्फर्मेशनने इतर सरकारी खाती व अनेक ब्रिटिश राष्ट्रीय संस्थांच्या सहकार्याने हा संदर्भग्रंथ तयार केला आहे. परदेशात ब्रिटनसंबंधी वारंवार जे प्रश्न विचारले जातात त्यांना उत्तरे देण्याचा हेतू या ग्रंथाच्या मागे बाळगण्यात आला आहे. अचूक माहितीबद्दल या हँडबुकने विलक्षण लौकिक मिळविला असून एक उत्कृष्ट दर्जाचे संदर्भ साहित्य म्हणून ते अतिशय वाचनीय झालेले आहे. तीस सप्टेंबर १९६७ पर्यंतच्या घडामोडींचा उल्लेख आलेला आहे. त्यात संपूर्ण विषयसूची, छायाचित्रे, नकाशे, आलेख यांचा समावेश करण्यात आलेला असून प्रत्येक प्रकरणानुसार संदर्भग्रंथांची २८ पानी सूचीही देण्यात आलेली आहे.

भारतात या हॅण्डबुकच्या कापडी बांधणीची किंमत ३२ रुपये ४० पैसे व साध्या कागदी आवरणातील बांधणीची किंमत २२ रुपये ५० पैसे ठेवण्यात आलेली आहे. त्याच्या प्रती पुढील पत्त्यावर मागणी नोंदवून मिळविता येतील. "ब्रिटिश इन्फर्मेशन सर्व्हिसेस, चाणक्यपुरी, नवी दिल्ली ११"

## केळ्यांची निर्यात करण्यासाठी खास लागवड

म्हैसूर राज्यात ५,००० एकर जमिनीत केळ्यांची लागवड करण्यात येणार आहे. केळ्यांची निर्यात करण्यासाठीच ही योजना हाती घेण्यात येत आहे. दक्षिण कॅनरामध्ये होणाऱ्या ह्या नव्या लागवडीमुळे मंगलोर बंदराचा व्यापार वाढून त्याला अधिक महत्त्व येईल. केळ्यांची निर्यात पद्धतशीरपणे व शास्त्रीय पद्धतीने करण्यात आली तर भारताला दरसाल २० कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ती होण्याची शक्यता आहे. पण त्यासाठी उत्कृष्ट प्रतीच्या केळ्यांचे उत्पादन करून ती टिकविण्याची व्यवस्था झाली पाहिजे. रशियाने भारताकडून १० कोटी रुपये किमतीची केळी आयात केलेली आहेत. त्याशिवाय जपान ३ लाख, ५० हजार टन वजनाची केळी आयात करतो.

## पोस्टाचे नवे दर १५ मे पासून अमलात

पोस्टाचे नवे दर १५ मे पासून अमलात येणार आहेत. त्यातील मुख्य वाढ म्हणजे ६ पैशाच्या पोस्टकार्डाला १० पैसे पडतील; १० पैशाच्या इनलंड लेटरला १५ पैसे पडतील आणि १५ पैशाचे पाकीट २० पैशाचे होईल. मनिऑर्डरी, रजिस्टर्ड-पत्रे, इत्यादींचेही दर वाढतील. ह्या सर्वांपासून भारत सरकारला सालिना २५ कोटी रु. जास्त मिळतील.

## लष्करी, नाविक आणि वायुदलातील अधिकाऱ्यांच्या श्रेणी

लष्करी, नाविक आणि वायुदलातील अधिकाऱ्यांच्या श्रेणी माहीत नसल्यामुळे पुष्कळ वेळा घोटाळा व गैरसमज संभवतो. ह्यासाठी त्याची माहिती येथे दिली आहे.

लष्कर :— जनरल, लेफ्टेनंट जनरल, मेजर जनरल, ब्रिगेडिअर, कर्नल, लेफ्टेनंट कर्नल, मेजर, कॅप्टन, लेफ्टेनंट, सेकंड–लेफ्टेनंट.

नौदल :—ॲडमिरल, व्हाइस ॲडमिरल, रिअर ॲडमिरल, कमोडोर, कॅप्टन, कमांडर, लेफ्टेनंट कमांडर, लेफ्टेनंट आणि सब–लेफ्टेनंट.


वायुदल :—एअर चीफ मार्शल, एअर मार्शल, एअर व्हाइस मार्शल, एअर कमोडोर, ग्रुप कॅप्टन, विंग कमांडर, स्क्वाड्रन लीडर, फ्लाइट लेफ्टेनंट, फ्लाइंग ऑफिसर आणि पायलट ऑफिसर.

## लोकसभेच्या सभासदांची आणखी सवलतींची मागणी

पार्लमेंटच्या सर्वपक्षीय समितीने एकमताने सरकारकडे आणखी सोई-सवलती मागण्याचे ठरविले आहे. त्यामुळे त्यांना अधिक कार्यक्षमतेने आपले काम करता येईल, अशी त्यांची अपेक्षा आहे. ह्या मागण्यांचे आता बिलातील दुरुस्त्यात रूपांतर होईल. सभासदांना अधिक पगार किंवा भत्ता नको आहे. त्यांनी एकमताने मंजूर केलेल्या ठरावाप्रमाणे सभासदांना 'अ' वर्गाचा फ्लॅट भाडे न घेता मिळावा; दरवर्षी कमाल ५०० रुपयांपर्यंत वीज व पाणी मोफत मिळावे, दरसाल १,००० रुपयांपर्यंत टपाल व तारखर्च सरकारने द्यावा, सभासदांच्या स्वतःच्या गावच्या घरी फुकट टेलिफोन असावा, स्वतःच्या मतदार संघात हिंडण्यासाठी सरकारने फुकट वाहने द्यावी, सभासदांना रेल्वेचा पहिल्या वर्गाचा 'अ' पास मिळावा, पहिल्या वर्गाचे भाडे आणि विमानाचे भाडे ह्यातील फरक देऊन त्यांना कोठेही विमानाने जाता यावे, सभासदांच्या स्टेनोग्राफरचा वार्षिक २,००० रु. पर्यंतचा खर्च सरकारने करावा, इत्यादी मागण्या करण्यात आल्या आहेत. हे एवढे सर्व मिळाल्यावर, आणखी पगार किंवा भत्ता नको म्हणणे भोंदूपणाचेच नव्हे काय?

## इं. टे. इंडस्ट्रीजची ५० लक्ष रु. ची निर्गत

दि इंडियन टेलिफोन इंडस्ट्रीज लि. बंगलोर ने १९६७–६८ मध्ये ५० लक्ष रु. किमतीची उपकरणे निर्गत केली. १९६२–६३ पासून आतापर्यंत १·५५ कोटी रु. ची उपकरणे निर्गत करण्यात आली आहेत. दारेसलाम शहरासाठी ५,००० लाइन्सच्या ऑटोमॅटेक एक्सचेंजची २४ लक्ष रु. ची ऑर्डर नुकतीच मिळाली आहे. पूर्व आफ्रिकेतील कुरसिमी गावाच्या ६०० लाइन्सच्या एक्सचेंजचीही ऑर्डर हाती आहे.




हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाविवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.